(3)

दिनांक १४ जानेवारी ते २८ जानेवारी, २०२६ या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**मराठी भाषा विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : मभापं-२०२५/प्र.क्र.२४४/ई- १४५८८०६/भाषा-२**

८ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : २४ डिसेंबर, २०२५

DATTAJIRAO KADAM A.S.C. COLLEGE ICHALKARANJI

**वाचा** :- मराठी भाषा विभाग, शासन निर्णय क्र. मभापं-२०१९/प्र.क्र.१११/भाषा-२, दि. १८.०९.२०२०

**प्रस्तावना :-**

राज्यातील सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालये/महामंडळे, केंद्र शासनाच्या अखत्यारीतील सर्व कार्यालये, मंडळे/महामंडळे, सार्वजनिक उपक्रम, सर्व खाजगी व व्यापारी बँका, सर्व शैक्षणिक संस्था/ विद्यापीठे/ महाविद्यालये इत्यादी संस्थांमधून राज्याची राजभाषा असलेल्या मराठी भाषेचा वापर जास्तीत जास्त व्हावा आणि मराठी भाषेचे संवर्धन व्हावे या हेतूने दरवर्षी "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" दि. १४ जानेवारी ते २८ जानेवारी या कालावधीमध्ये साजरा करण्यात येतो.

"मराठी भाषेचा प्रचार व प्रसार" या विभागाच्या मुख्य धोरणास अनुसरुन **"मराठी भाषा संवर्धन पंधरवडा"** साजरा करण्यासाठी दरवर्षी विविध कार्यक्रम आयोजित करण्याच्या सूचना देण्यात येतात. त्यानुसार यावर्षी देखील मराठी भाषेसंदर्भातील विविध कार्यक्रम मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यामध्ये आयोजित करण्यासाठी सर्व कार्यालयांना सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक :-**

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त सुयोग्य कार्यक्रम आयोजित करुन पंधरवडा समारंभपूर्वक साजरा करण्यासाठी सर्व कार्यालयांना पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत:-

### अ) राज्यातील सर्व कार्यालयांनी करावयाचे कार्यक्रम :-

१) मराठी भाषेसंबंधी, वाङ्मयासंबंधी विविध परिसंवाद /व्याख्याने / कार्यशाळा /शिबीरे/ कविसंमेलने/ एकांकिका/ बालनाट्ये/ नाटके/ पुस्तक प्रकाशन समारंभ/ साहित्य पुरस्कार वितरण यांचे आयोजन करणे.
२) मराठी भाषेत निबंध/ प्रश्नमंजुषा/ कथाकथन/ चारोळीलेखन/ कथालेखन/ कवितालेखन/ हस्ताक्षर/ शुद्धलेखन/ वक्तृत्व/ घोषवाक्ये/ अभिवाचन/ वादविवाद/ अंताक्षरी/ शब्दकोडी/ मराठी साहित्यासंबंधी पुस्तकांचे रसग्रहण/ समीक्षण/ परिच्छेद अनुवाद इत्यादी स्पर्धा घेणे.
३) मराठी वाचन संस्कृती वाढावी यादृष्टीने मराठी भाषेतील अभिजात ग्रंथांचा परिचय करुन देण्यासाठी मराठी भाषेतील तज्ज्ञ नामवंत व्यक्ती/ लेखक/ वक्ते यांच्याकडून मार्गदर्शन, परिसंवाद, कार्यशाळा यांचे आयोजन करणे.
४) ग्रंथ प्रदर्शन, ग्रंथदिंडी, कथाकथन, काव्यवाचन, माहितीपट इत्यादी साहित्यिक व सांस्कृतिक कार्यक्रम करणे.
५) वेगवेगळ्या क्षेत्रात यशस्वी असणाऱ्या मराठी भाषक व्यक्तींचा सत्कार, मुलाखती घेणे.

21/01/26.

Scanned with OKEN Scanner

६) राज्यातील अमराठी भाषिकांना मराठी भाषेचा सुलभ पध्दतीने परिचय करुन देण्याच्या दृष्टीने कार्यशाळा/ भाषेसंबंधी स्पर्धांचे आयोजन करणे.

७) मराठी भाषेच्या वापराबाबत जागरुकता निर्माण करण्याकरिता संबंधित कार्यालयांनी संकेतस्थळ, आकाशवाणी, दूरदर्शन, खाजगी दूरचित्रवाहिन्या, एफ.एम.रेडिओ, स्थानिक केबल नेटवर्क, फेसबुक, ट्विटर, व्हॉट्सॲप इ. अशा आधुनिक प्रसार माध्यमातून याबाबतचे दृक-श्राव्य संदेश प्रसारित करावेत.

८) मराठी भाषेचा प्रचार, प्रसार व विकास यासाठी विविध मार्गांनी स्वयंप्रेरणेने काम करणाऱ्या व्यक्ती/ संस्था यांच्या कार्यास प्रोत्साहन देण्यासाठी त्यांच्या कार्याचा गौरव/ सत्कार करणे.

९) टंकलेखनाकरिता युनिकोड मराठीचा जास्तीतजास्त वापर करण्यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रोत्साहित करावे.

१०) मराठी भाषेचा प्रचार, प्रसार या उद्दिष्टांसह रोजगाराभिमुख उपक्रमातून जास्तीत जास्त तरुण पिढीला आकर्षित करण्यासाठी खालील विषयावरील तसेच अशा स्वरुपाच्या अन्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे.

१. अनुवादलेखन
२. व्यावसायिक लेखन
३. पुस्तक निर्मिती व प्रकाशन प्रक्रिया
४. स्व-प्रकाशन
५. ई-बुक
६. ऑनलाईन पुस्तक विक्री
७. लेखक प्रकाशन करार
८. संहिता लेखन
९. विकिपिडिया कार्यशाळा
१०. शॉर्ट फिल्म/डॉक्युमेंटरी लेखन

११) डिजिटल साहित्य संमेलनाचे आयोजन करणे, तसेच मराठी वाचन संस्कृती जपण्यासाठी सर्वांनी मराठीतील साहित्य स्वयंस्फुर्तीने वाचणे, तसेच पुस्तके विकत घेणे, इतरांना भेट देणे इत्यादी उपक्रम राबवावेत.

१२) प्रत्येक जिल्ह्यात पुस्तकाची जत्रा आयोजित करण्यात यावी. या जत्रेत लोक आपली पुस्तके नि:शुल्क किंवा स्वस्त दरामध्ये इतरांना देऊ शकतील. तसेच, या जत्रेदरम्यान मराठीच्या प्रचार व प्रसारासाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे.

१३) महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ नुसार वर्जित प्रयोजने वगळता शासकीय कामकाज १००% मराठी भाषेतून करणे आवश्यक आहे. तर, त्रिभाषा सूत्रानुसार राज्यातील केंद्र शासनाच्या अखत्यारीतील सर्व कार्यालये/सार्वजनिक उपक्रम यांनी मराठी भाषेचा वापर करणे अनिवार्य आहे. त्यामुळे मराठी भाषेच्या प्रचार व प्रसारासंदर्भात सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्हा मराठी भाषा समितीमार्फत विविध उपक्रम राबवावेत तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश, नियम, अधिनियम संबंधितांच्या निदर्शनास आणावेत.

१४) सर्व संस्थांनी समाज माध्यमांवर "मराठी वाचन कट्टा" निर्मिती करावी.

१५) सर्व क्षेत्रीय कार्यालयांनी पंधरवड्याच्या निमित्ताने मराठी प्रचार, प्रसार व विकासासाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करावे.

१६) मराठी भाषेच्या अभिजात दर्जाबाबत सर्वसामान्यांना माहिती व्हावी यासाठी सर्व क्षेत्रीय कार्यालयांनी राज्य मराठी विकास संस्थेच्या समन्वयाने विविध कार्यक्रमांचे आयोजन करावे.



Scanned with OKEN Scanner

DATTAJIRAO KADAM A.S. ICHALKARANJI

**ब) राज्यस्तरावर साहित्य संस्थांच्या मदतीने वरील "अ" प्रमाणे करावयाची कार्यवाही :-**

राज्यस्तरावर वरील कार्यक्रम सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ व राज्य मराठी विकास संस्था यांनी खालीलप्रमाणे साहित्य संस्थांची मदत घेऊन त्या साहित्य संस्थांसमोर दर्शविलेल्या जिल्ह्यात कार्यक्रम आयोजित करावेत.

| अ.क्र. | साहित्य संस्था | साहित्य संस्थेच्या अंतर्गत जिल्हे |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे | नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, अहिल्यानगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर |
| २ | मराठवाडा साहित्य परिषद, छत्रपती संभाजीनगर | छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, बीड, नांदेड, धाराशिव, लातूर. |
| ३ | विदर्भ साहित्य संघ, नागपूर | बुलडाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली |
| ४ | कोकण मराठी साहित्य परिषद, रत्नागिरी | रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग, ठाणे, पालघर, मुंबई उपनगर |
| ५ | दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर | कोल्हापूर |
| ६ | मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई. | मुंबई शहर |

**क)** आंतरराष्ट्रीय व आंतरराज्यीय महाराष्ट्र मंडळांनी देखिल या कालावधीत अनुक्रमे परदेशात व इतर राज्यात उपरोक्त "अ" मध्ये नमूद केल्यापैकी कार्यक्रम आयोजित करावेत.

**ड)** भाषा संचालनालयाने व महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाने तयार केलेल्या भ्रमणध्वनी उपयोजकाबद्दल (मोबाईल ॲप) तसेच मराठी भाषा विभागाच्या व त्या अंतर्गत कार्यालयांच्या संकेतस्थळांबद्दलची माहिती भाषा पंधरवड्याच्या निमिताने शाळा व महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांपर्यंत प्रसारीत करण्याची जबाबदारी चारही क्षेत्रीय कार्यालयांची राहील.

**ई)** सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी "मराठी भाषा प्रचार व प्रसाराचे उपक्रम (कार्यक्रम)" महसूली विभाग व जिल्हास्तरावर राबविण्यासाठी निधी उपलब्ध करणेबाबतचा शासन निर्णय क्र.मभावा-२०२०/प्र.क्र.९८/भाषा-२, दि.२४.०६.२०२२ मधील परिच्छेद २ मध्ये नमूद केल्यानुसार कार्यवाही करावी. सदर कार्यक्रमांचे आयोजन करण्यासाठी भाषा संचालनालय, मुंबई, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई आणि राज्य मराठी विकास संस्था, मुंबई तसेच परिच्छेद "ब" येथे दर्शविलेल्या साहित्य संस्थांची मदत घेता येईल.

२. राज्यात तसेच जिल्हा स्तरावर त्यांच्या अखत्यारित असलेल्या कार्यक्षेत्रात वर दिलेल्या कार्यक्रमाप्रमाणे खालील कार्यालयांनी आयोजन करावे.

अ) मुंबई (मुख्यालय स्तरावर)- सर्व मंत्रालयीन विभाग, त्यांच्या अधिपत्याखालील मुंबईतील शासकीय कार्यालये



Scanned with OKEN Scanner

DATTAJIRAO KADAM A.S.C. COLLEGE ICHALKARANJI

आ) सर्व विभागीय आयुक्तांची कार्यालये

इ) सर्व जिल्हाधिकारी कार्यालये तसेच विविध विभागांच्या अधिपत्याखालील जिल्हास्तरीय कार्यालये

ई) मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद)-तालुकास्तरावर, ग्रामीणस्तरावर

उ) शासनाच्या अखत्यारितील कार्यालये/मंडळे/महामंडळे/सार्वजनिक उपक्रम,स्थानिक स्वराज्य संस्था

ऊ) शिक्षण संचालक/सर्व विभागीय सह संचालक/ उप संचालक/ जिल्हा शिक्षण अधिकारी (प्राथमिक/माध्यमिक/उच्च माध्यमिक/ प्रौढ शिक्षण व अल्पसंख्यांक) कार्यालये व त्यांच्या अधिनस्त कार्यालये

ए) सर्व संचालक (उच्च शिक्षण,तंत्र शिक्षण, व्यवसाय विभाग, ग्रंथालये ) कार्यालये व त्यांच्या अधिनस्त कार्यालये

ऐ) महाराष्ट्र राज्यातील केंद्र सरकारची सर्व कार्यालये व आस्थापना आणि महाराष्ट्र राज्यातील जनतेला बँकींग, दूरध्वनी, टपाल, विमा, रेल्वे, मेट्रो, मोनोरेल, विमान प्रवास, गॅस, पेट्रोलियम, कराधान,पारपत्र इत्यादी सेवा पुरविणारी अन्य कार्यालये.

३. या कार्यक्रमांकरीता येणारा खर्च प्रत्येक वित्तीय वर्षात त्या त्या संबंधित विभागाने/कार्यालयाने त्यांच्या कार्यालयीन खर्चासाठी मंजूर होणाऱ्या आर्थिक तरतूदीतून अदा करावा.

४. सर्व कार्यालयांनी वरीलप्रमाणे कार्यक्रम आयोजित करुन या विभागास कार्यक्रमांबाबतचा अहवाल सादर करावा.

५. मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करतांना त्या त्या प्रदेशात लागू असलेल्या आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन होणार नाही याची सर्व संबंधितांनी दक्षता घ्यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२५१२२४१२३००९४५३३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

NAMDEO KONDIBA BHOSALE

( डॉ. नामदेव भोसले )
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. सर्व सन्माननीय विधानंडळ सदस्य.
३. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. उपमुख्यमंत्री, (नगर विकास, गृह निर्माण, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. उपमुख्यमंत्री, (वित्त, नियोजन व राज्य उत्पादन शुल्क) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा.मंत्री (मराठी भाषा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.



Scanned with OKEN Scanner

७. मा.सभापती, विधान परिषद यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.
८. मा.उप सभापती, विधान परिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी, विधान भवन, मुंबई.
९. मा.अध्यक्ष, विधानसभा यांचे सचिव, विधानभवन, मुंबई.
१०. मा.उपाध्यक्ष, विधानसभा यांचे सचिव, विधानभवन, मुंबई.
११. मा.विरोधी पक्षनेता (विधानसभा) यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई.
१२. मा.विरोधी पक्षनेता (विधान परिषद) यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई.
१३. मा.मुख्य सचिव , महाराष्ट्र शासन यांचे सह सचिव, मंत्रालय, मुंबई.
१४. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
१५. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.
१६. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानसभा, विधानभवन, मुंबई.
१७. सर्व विभागीय आयुक्त
१८. सर्व जिल्हाधिकारी
१९. कुलगुरु, सर्व विद्यापीठे
२०. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२१. शिक्षण संचालक (प्राथमिक /माध्यमिक/उच्च माध्यमिक/प्रौढ शिक्षण व अल्पसंख्यांक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
२२. संचालक (उच्च शिक्षण, तंत्र शिक्षण, व्यवसाय शिक्षण, ग्रंथालये ), महाराष्ट्र राज्य, पुणे,
२३. प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई (पत्राने),
२४. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई (पत्राने),
२५. प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
२६. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने),
२७. महालेखापाल (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई,
२८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२९. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
३०. भाषा संचालक, भाषा संचालनालय, वांद्रे (पूर्व), मुंबई,
३१. सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई,
३२. सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई,
३३. संचालक, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई,
३४. सर्व विभागीय सहायक भाषा संचालक, पुणे / नागपूर / छत्रपती संभाजीनगर / नवी मुंबई,
३५. कार्यकारी अधिकारी,आकाशवाणी केंद्र,एच.टी.पारेख मार्ग,आमदार निवास समोर, चर्चगेट, मुंबई-४०००२०
३६. कार्यकारी अधिकारी, दूरदर्शन केंद्र, वरळी, पांडुरंग बुधकर मार्ग, वरळी, मुंबई
३७. सर्व केंद्रीय कार्यालयांची मुख्यालये /बँका, विमा कंपन्या व सार्वजनिक उपक्रम यांची मुख्यालये/रेल्वे/ विमान वाहतूक यांची मुख्यालये
३८. सर्व मंत्रालयीन विभाग
३९. महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे
४०. मराठवाडा साहित्य परिषद, छत्रपती संभाजीनगर
४१. विदर्भ साहित्य संघ, नागपूर
४२. कोकण मराठी साहित्य परिषद, रत्नागिरी
४३. दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर
४४. मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई.
४५. निवडनस्ती (भाषा-२).

DATTAJIRAO KADAM A.S.C. COLLEGE ICHALKARANJI



Scanned with OKEN Scanner

प्रो.(डॉ.) सुभाष गणपती जाधव
प्रमुख, मराठी विभाग,
डी.के.ए.एस.एस.सी.कॉलेज,
इचलकरंजी
दिनांक :- १९/०१/२०२६

प्रति,

मा.प्राचार्य,

दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज,
इचलकरंजी

**विषय :- "मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त" "मराठी साहित्य लेखन" कार्यशाळा घेण्यास परवानगी मिळणेबाबत ...**

महोदय,

वरील विषयास अनुसरून अर्ज करतो की, दिनांक १४ जानेवारी ते २८ जानेवारी २०२६ या कालावधीत शासन परिपत्रक क्रमांक :मभापं – २०२५ / प्र. क्र.२४४ / ई – १४५८८०६ / भाषा – २ दिनांक २४ डिसेंबर,२०२५ च्या परिपत्रक नुसार **"मराठी भाषा संवर्धन पंधरवडा"** सर्वत्र संपन्न होत आहे. या निमित्ताने महाविद्यालयातील वरिष्ठ विभागाकडील विद्यार्थी – विद्यार्थिनींसाठी **"मराठी साहित्य लेखन कार्यशाळा"** शनिवार दिनांक २४/०१/२०२६ रोजी सकाळी ९.३० वाजता महाविद्यालयाच्या स्मार्ट रूम नंबर ३८ मध्ये आयोजित करीत आहे.

या कार्यशाळेसाठी मा. श्री. अशोक जाधव (भंगार पुस्तकाचे लेखक) हे मार्गदर्शन करणार आहेत. सदरची कार्यशाळा दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर यांचेशी झालेल्या सामंजस्य (MOU) करारांतर्गत आयोजित केली आहे. तरी सदर कार्यक्रम घेण्यासाठी परवानगी मिळावी ही नम्र विनंती.
कळावे,

Rs- 1000/- मानधन देणे

19/01/26.

DATTAJIRAO KADAM A.S.C. COLLEGE ICHALKARANJI

आपला विश्वासू

प्रो.(डॉ.) सुभाष जाधव
प्रमुख
मराठी विभाग
डी.के.ए.एस.सी.कॉलेज
इचलकरंजी

" ज्ञान,विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार "

- शिक्षणमहर्षी डॉ बापूजी साळुंखे

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha kolhapur's

Dattajirao Kadam Arts, Science and Commerce College, Ichalkaranji

Tal.- Hatkanangle Dist.- Kolhapur

# DEPARTMENT OF MARATHI & IQAC

Academic Year 2025-2026

दिनांक :- २०/०१/२०२६

## सूचना

## "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा"

महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते कि, दिनांक १४ जानेवारी २०२६ ते २८ जानेवारी २०२६ या कालावधीत **"मराठी भाषा संवर्धन पंधरवडा"** सर्वत्र संपन्न होत आहे. सदर पंधरवडा महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग,शासन परिपत्रक क्रमांक : मभापं - २०२५ प्र.क्र. २४४ /ई – १४५८८०६ / भाषा- २ दिनांक : २४ डिसेंबर २०२५ च्या पत्रानुसार साजरा होत आहे.

या निमित्ताने महाविद्यालयातील वरिष्ठ विभागाकडील विद्यार्थी – विद्यार्थिनींसाठी **"मराठी साहित्य लेखन कार्यशाळा"** शनिवार दिनांक २४/०१/२०२६ रोजी सकाळी ९.३० वाजता महाविद्यालयाच्या स्मार्ट रूम नंबर ३८ मध्ये आयोजित करीत आहे.

या कार्यशाळेसाठी प्रमुख वक्ते मा. श्री. अशोक जाधव (भंगार पुस्तकाचे लेखक) हे मार्गदर्शन करणार आहेत. हा कार्यक्रम दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर यांचेशी झालेल्या सामंजस्य (MOU) करारांतर्गत संपन्न होत आहे. तरी सदर कार्यक्रमासाठी स्मार्ट रूम नंबर ३८ मध्ये विद्यार्थ्यांनी वेळेवर उपस्थित रहावे.

प्रो.(डॉ.) सुभाष जाधव
प्रमुख
मराठी विभाग
डी.के.ए.एस.सी.कॉलेज
इचलकरंजी

प्रो.(डॉ.) एस.के. खाडे
प्राचार्य,
डी.के.ए.एस.सी. कॉलेज,
इचलकरंजी.

DATTAJIRAO KADAM A.S.C. COLLEGE ICHALKARANJI

"Dissemination of Education for Knowledge, Science and Culture."
– Shikshanmaharshi Dr Bapuji Salunkhe

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha kolhapur's
Dattajirao Kadam Arts, Science and Commerce College, Ichalkaranji
Tal.- Hatkanangle Dist.- Kolhapur

## DEPARTMENT OF MARATHI & IQAC

Academic Year 2025-2026

Date :- 20/01/2026

# Notice

# "Marathi Language Conservation Fortnight"

All the students of the college are informed that the "Marathi Language Promotion Fortnight" is being held everywhere from January 14, 2026 to January 28, 2026. This fortnight is being celebrated as per the letter of Government of Maharashtra, Marathi Language Department, Government Circular No.: MBHAP - 2025 Pr.No. 244 /E – 1458806 / Language- 2 Dated: 24th December 2025

On this occasion, a "Marathi Literature Writing Workshop" is being organized for the students of the senior department of the college on Saturday, 24/01/2026 at 9.30 am in the college's Smart Room No. 38.

The keynote speaker for this workshop will be Hon. Mr. Ashok Jadhav (Author of Bhangar Book). This program is being organized under a Memorandum of Understanding (MOU) with Dakshin Maharashtra Sahitya Sabha, Kolhapur. However, students should be present on time in Smart Room No. 38 for the said program.

Prof. (Dr.) Subhash Jadhav
HEAD,
Department of Marathi,
D.K.A.S.C. College,
Ichalkaranji.

Prof. (Dr.) S. K. Khade
प्राचार्य,
डी.के.ए.एस.सी. कॉलेज,
इचलकरंजी.

DATTAJIRAO KADAM A.S.C. COLLEGE ICHALKARANJI

स्थापना : जून १९६२

"Dissemination of Education for Knowledge, Science & Culture" - Sikshanmaharshi Dr. Bapuji Salunkhe

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha, Kolhapur's

# Dattajirao Kadam Arts, Science and Commerce College, Ichalkaranji.



NAAC- "B+" Grade

Tal. Hatkanangale, Dist. Kolhapur - 416 115. Office : (0230) 2420 412

Principal : (0230) 2991617 Email : dkasccollege@gmail.com Website : www.dkasc.ac.in

(Permanently Affiliated to Shivaji University, Kolhapur - No. Affi/T-2/5049 dt 10-07-1999)

ज्यु. कॉलेज-शासन आदेश क्रमांक - एचएससी/०७/वीस/एकवीस, दि. ६-५-१९७६ Jr. Index No. J-23.06.001


| Founder | President | Chairman | Secretary | Principal |
| --- | --- | --- | --- | --- |
| Shikshanmaharshi Dr. Bapuji Salunkhe | Hon. Chandrakant (Dada) Patil<br>Minister, Higher and Technical Education, Gov. of Maharashtra | Hon. Prin. Abhaykumar Salunkhe<br>M.A. | Hon. Prin. Mrs. Shubhangi Gawade<br>M.Sc., B.Ed. | Prof. (Dr.) S. K. Khade<br>M.Sc. Ph.D. |


Outward No. : DKASC / 584 / 25-26

Date : 21/01/2026.

## निमंत्रण पत्र

प्रति,
मा.मुख्याध्यापक
व्यंकटराव हायस्कूल,
इचलकरंजी

**विषय :- मा. श्री. अशोक जाधव (भंगार पुस्तकाचे लेखक) यांना प्रमुख वक्ते म्हणून पाठवून देणेबाबत ....**

महोदय,

आमच्या महाविद्यालयात **"मराठी भाषा संवर्धन पंधरवडा"** (दिनांक १४ जानेवारी ते २८ जानेवारी २०२६) या कालावधीत संपन्न होत आहे. या निमित्ताने **मा. श्री. अशोक जाधव (भंगार पुस्तकाचे लेखक) यांचे " मराठी साहित्य लेखन प्रक्रिया "** या विषयावर शनिवार दिनांक २४/०१/२०२६ रोजी सकाळी ९.३० वाजता महाविद्यालयाच्या स्मार्ट रूम नंबर ३८ मध्ये व्याख्यान आयोजित केले आहे. तरी या कार्यक्रमास प्रमुख वक्ते म्हणून **मा. श्री. अशोक जाधव** यांना पाठवून देऊन सहकार्य करावे ही नंम्र विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

प्रो.(डॉ.) सुभाष जाधव
प्रमुख
मराठी विभाग
डी.के.ए.एस.सी.कॉलेज
इचलकरंजी

प्रो.(डॉ.) एस.के. खाडे
प्राचार्य,
डी.के.ए.एस.सी. कॉलेज,
इचलकरंजी.

DATTAJIRAO KADAM A.S.C. COLLEGE ICHALKARANJI

स्थापना : जून १९६२

ICHALKARANJI
NAAC- "B+" Grade

"Dissemination of Education for Knowledge, Science & Culture" - Sikshanmaharshi Dr. Bapuji Salunkhe
Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha, Kolhapur's
# Dattajirao Kadam Arts, Science and Commerce College, Ichalkaranji.

Tal. Hatkanangale, Dist. Kolhapur - 416 115. Office : (0230) 2420 412
Principal : (0230) 2991617 Email : dkasccollege@gmail.com Website : www.dkasc.ac.in

(Permanently Affiliated to Shivaji University, Kolhapur - No. Affi/T-2/5049 dt 10-07-1999)
ज्यु. कॉलेज-शासन आदेश क्रमांक - एचएससी/०७/वीस/एकवीस, दि. ६-५-१९७६ Jr. Index No. J-23.06.001

| Founder | President | Chairman | Secretary | Principal |
|---|---|---|---|---|
| Shikshanmaharshi Dr. Bapuji Salunkhe | Hon. Chandrakant (Dada) Patil<br>Minister, Higher and Technical Education, Gov. of Maharashtra | Hon. Prin. Abhaykumar Salunkhe<br>M.A. | Hon. Prin. Mrs. Shubhangi Gawade<br>M.Sc., B.Ed. | Prof. (Dr.) S. K. Khade<br>M.Sc. Ph.D. |

Outward No. : DKASC / 589 / 25/26 Date 21/01/2026

## निमंत्रण पत्र

प्रति,
मा. श्री. अशोक जाधव,
व्यंकटराव हायस्कूल ,
इचलकरंजी

**विषय :- "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" निमित्त प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहणेबाबत ....**

महोदय ,

आमच्या महाविद्यालयात **"मराठी भाषा संवर्धन पंधरवडा"** (दिनांक १४ जानेवारी ते २८ जानेवारी २०२६) या कालावधीत संपन्न होत आहे. या निमित्ताने आपले **" मराठी साहित्य लेखन प्रक्रिया "** या विषयावर शनिवार दिनांक २४/०१/२०२६ रोजी सकाळी ९.३० वाजता महाविद्यालयाच्या स्मार्ट रूम नंबर ३८ मध्ये आपले व्याख्यान आयोजित केले आहे. तरी या कार्यक्रमास आपण प्रमुख वक्ते म्हणून आपण उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे ही नंम्र विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

जाधव 21/01/26

DATTAJIRAO KADAM A.S.C. COLLEGE ICHALKARANJI

प्रो.(डॉ.) सुभाष जाधव
प्रमुख
मराठी विभाग
डी.के.ए.एस.सी.कॉलेज
इचलकरंजी

प्रो.(डॉ.) एस. के. खाडे
प्राचार्य,
डी.के.ए.एस.सी. कॉलेज,
इचलकरंजी.

स्थापना : जून १९६२

ICHALKARANJI

NAAC- "B+" Grade

"Dissemination of Education for Knowledge, Science & Culture" - Sikshanmaharshi Dr. Bapuji Salunkhe

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha, Kolhapur's

**Dattajirao Kadam Arts, Science and Commerce College, Ichalkaranji.**

Tal. Hatkanangale, Dist. Kolhapur - 416 115. Office : (0230) 2420 412

Principal : (0230) 2991617 Email : dkasccollege@gmail.com Website : www.dkasc.ac.in

(Permanently Affiliated to Shivaji University, Kolhapur - No. Affi/T-2/5049 dt 10-07-1999)

ज्यु. कॉलेज-शासन आदेश क्रमांक - एचएससी/०७/वीस/एकवीस, दि. ६-५-१९७६ Jr. Index No. J-23.06.001

| Founder | President | Chairman | Secretary | Principal |
|---|---|---|---|---|
| Shikshanmaharshi Dr. Bapuji Salunkhe | Hon. Chandrakant (Dada) Patil<br>Minister, Higher and Technical Education, Gov. of Maharashtra | Hon. Prin. Abhaykumar Salunkhe<br>M.A. | Hon. Prin. Mrs. Shubhangi Gawade<br>M.Sc., B.Ed. | Prof. (Dr.) S. K. Khade<br>M.Sc. Ph.D. |

Outward No. : DKASC / समक्ष / 25-26

Date : 24/01/2026

## आभार पत्र

प्रति,
मा. श्री. अशोक जाधव,
व्यंकटराव हायस्कूल ,
इचलकरंजी

**विषय :- "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" निमित्त प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहिलेबाबत ....**

महोदय ,

आमच्या महाविद्यालयात **"मराठी भाषा संवर्धन पंधरवडा"** (दिनांक १४ जानेवारी ते २८ जानेवारी २०२६) या कालावधीत संपन्न झाला. या निमित्ताने आपले **" मराठी साहित्य लेखन प्रक्रिया"** या विषयावर शनिवार दिनांक २४/०१/२०२६ रोजी सकाळी ९.३० वाजता महाविद्यालयाच्या स्मार्ट रूम नंबर ३८ मध्ये व्याख्यान आयोजित केले आहे. आपण या कार्यक्रमास प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याबद्दल आपले मन:पूर्वक आभार !!!

यापुढेही असेच सहकार्य राहो. !!

कळावे,

आपला विश्वासू,

प्रो.(डॉ.) सुभाष जाधव
प्रमुख
मराठी विभाग
डी.के.ए.एस.सी.कॉलेज
इचलकरंजी

प्रो.(डॉ.) एस.के. खाडे
प्राचार्य,
डी.के.ए.एस.सी. कॉलेज,
इचलकरंजी.

" ज्ञान,विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार "
- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha kolhapur's
Dattajirao Kadam Arts, Science and Commerce College, Ichalkaranji
Tal.- Hatkanangle Dist.- Kolhapur

# DEPARTMENT OF MARATHI & IQAC

Academic Year 2025-2026

## "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा"

(१४ जानेवारी २०२६ ते २८ जानेवारी २०२६)

## "मराठी साहित्य लेखन " कार्यशाळा

वार :- शनिवार
दिनांक :- २४/०१/ २०२६

मराठी विभाग आणि दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा , कोल्हापूर यांच्याशी झालेल्या सामंजस्य करारांतर्गत व श्रीमती आ.रा.पाटील कन्या महाविद्यालय, इचलकरंजी यांच्या संयुक्त विद्यमाने

'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' निमित्त "मराठी साहित्य लेखन कार्यशाळा"

## कार्यक्रम पत्रिका

१.प्रतिमा पूजन :- उपस्थित मान्यवरांच्या हस्ते

२.प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय :- प्रा.(डॉ.) सुभाष जाधव
(प्रमुख, मराठी विभाग, डी.के.ए.एस.सी.कॉलेज, इचलकरंजी)

३.प्रमुख वक्ते :- मा.श्री.अशोक जाधव (भंगार पुस्तकाचे लेखक)
( व्यंकटराव हायस्कूल , इचलकरंजी )

विषय :- " मराठी साहित्य लेखन "

४.अध्यक्ष :- मा. प्राचार्य प्रो.(डॉ.) एस. के. खाडे
(दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी)

५.प्रमुख उपस्थिती :- मा. डॉ. विनोद कांबळे
(कार्यवाह, दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर)

६.आभार :- डॉ. अनिता आंबोकर
(प्रमुख, मराठी विभाग, आ.रा.पाटील कन्या महाविद्यालय , इचलकरंजी)

७.सूत्रसंचालन :- श्री रोहित शिंगे

स्थळ : स्मार्ट रूम नंबर ३८
वेळ : ०९.०३० वाजता

DATTAJIRAO KADAM A.S.C. COLLEGE ICHALKARANJI

संयोजक
प्रो.(डॉ.) सुभाष जाधव

Principal,
D.K.A.S.C College
Ichalkaranji.

" ज्ञान,विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार "
- शिक्षणमहर्षी डॉ बापूजी साळुंखे

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha kolhapur's
Dattajirao Kadam Arts, Science and Commerce College, Ichalkaranji
Tal.- Hatkanangle Dist.- Kolhapur

# DEPARTMENT OF MARATHI & IQAC

Academic Year 2025-2026

## "Marathi Language Conservation Fortnight"
(14 January 2026 to 28 January 2026)
## "Marathi Literary Writing" Workshop

Day :- Saturday
Date :- 24/01/2026

## "Marathi Literature Writing Workshop"

Under the Memorandum of Understanding (MoU) signed with Marathi Department and Dakshin Maharashtra Sahitya Sabha, Kolhapur and jointly sponsored by Smt. A.R. Patil Kanya College, Ichalkaranji

"Marathi Literature Writing Workshop" on the occasion of 'Marathi Language Conservation Fortnight'

## Program Schedule

**1. Image Worship** :- **By All Dignitaries**

**2. Introduction** :- **Prof. (Dr.) Subhash Jadhav**
(Head, Department of Marathi, D.K.A.S.C. College, Ichalkaranji)

**3. Resource Person** :- **Mr. Ashok Jadhav**
**(Author of Bhangar Book)**
(Venkatarao High School, Ichalkaranji)
**Subject :- "Marathi Literary Writing"**

**4.President** :- **Principal Prof.(Dr.) S. K. Khade**
(Dattajirao Kadam Arts, Science and Commerce College, Ichalkaranji)

**5. Chief Guest** :- **Hon. Dr. Vinod Kamble**
(Executive, South Maharashtra Sahitya Sabha, Kolhapur)

**6. Thanks** :- **Dr. Anita Ambokar**
(Head, Marathi Department, A.R. Patil Girls' College, Ichalkaranji)

**7. Anchor** :- **Shri. Rohit Shinge**

**Venue : Smart Room No.38**
**Time : 09.30 Onwards**

Organizer
Prof. (Dr.) Subhash Jadhav

DATTAJIRAO KADAM A.S.C. COLLEGE ICHALKARANJI

Principal,
D.K.A.S.C. College,
Ichalkaranji.

" ज्ञान,विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार " - शिक्षणमहर्षी डॉ बापूजी साळुंखे

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha kolhapur's

Dattajirao Kadam Arts, Science and Commerce College, Ichalkaranji

# DEPARTMENT OF MARATHI (2025-26)



मराठी विभाग, आणि दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा , कोल्हापूर यांच्याशी झालेल्या
सामंजस्य करारांतर्गत व श्रीमती आ.रा.पाटील कन्या महाविद्यालय, इचलकरंजी
यांच्या संयुक्त विद्यमाने

**वार :- शनिवार**

**दिनांक :- २४/०१/२०२६**

## 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' निमित्त
## "मराठी साहित्य लेखन कार्यशाळा"

**प्रमुख वक्ते :- मा.श्री. अशोक जाधव (भंगार आत्मकथनाचे लेखक)**

(व्यंकटराव हायस्कूल, इचलकरंजी)

**अध्यक्ष :- मा. प्राचार्य प्रो.(डॉ.) एस. के. खाडे**

(दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी)

**प्रमुख उपस्थिती :- डॉ. विनोद कांबळे**

(कार्यवाह, दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा , कोल्हापूर)

**डॉ. अनिता आंबोकर**

(प्रमुख,मराठी विभाग, श्रीमती आ.रा.पाटील कन्या कॉलेज, इचलकरंजी)

**संयोजक :- प्रो.(डॉ.) सुभाष जाधव**

(प्रमुख,मराठी विभाग, डी.के.ए.एस.सी.कॉलेज, इचलकरंजी)

DATTAJIRAO KADAM A.S.C. COLLEGE ICHALKARANJI

" ज्ञान,विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार "

- शिक्षणमहर्षी डॉ बापूजी साळुंखे

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha kolhapur's

# Dattajirao Kadam Arts, Science and Commerce College, Ichalkaranji

Tal.- Hatkanangle Dist.- Kolhapur

## Department of Marathi & IQAC

Academic Year 2025-2026

### Student Attendance

वर्ग ( Class) :- B. A/M.A.. - I / II / III                Date : - २४/०१/२०२६

कार्यक्रमाचे नाव (Activity Name) : -**"मराठी भाषा संवर्धन पंधरवडा"** निमित्ताने **"मराठी साहित्य लेखन कार्यशाळा"** आयोजित करण्यात आली.

**प्रमुख वक्ते :- मा. श्री. अशोक जाधव (भंगार पुस्तकाचे लेखक)**

**अध्यक्ष :- मा. प्राचार्य प्रो.(डॉ.) एस. के. खाडे**

| अ.क्र. sr. no. | रोल नंबर Roll no. | विद्यार्थिनीचे नाव Student Name | वर्ग Class | सही Signature |
|---|---|---|---|---|
| १ | | Dhanshree Dattatray Hanbar | B.A III | DDHanbar |
| २ | | Iqrazareen Ayaz Wejkar | BA III | IWejkar |
| ३ | | Dhanashri suresh mane. | B.A II | D.S.mane |
| ४ | | Soumya Shivanand Farale. | B.A. I | S.S. Farale. |
| ५ | | Rani Kallappa Shendare. | B.A.I | R.K.Shendare |
| ६ | | Sanika Raju Helari | B.A I | Sanika |
| ७ | | Vaishnavi Shashikant Kamble | B.A I | V.S.Kamble |
| ८ | | Manasi Mohan sawant | B.A.I | MSawant |
| ९ | | Prajakta Anil Hupare | B.A I | P.A.Hupare |
| १० | | Manasi Kiran Kamble | B.A.I | [illegible] |
| ११ | | Tamanna Sharif Shaikh | B.A.I | [illegible] |
| १२ | | Saniya Sikandar Mujawar | B.A.I | S.S.Mujawar |
| १३ | | Gouri Dnyeshwer Waichal | B.A II | G.D.W |
| १४ | | Nandini Krushna Mane | B.A II | N.K.M |
| १५ | | Pranjal Ramesh Thoke | B.A II | P.R.T |
| १६ | | Snela Sunil Amane | M.A I | Snela |
| १७ | | Sarika santosh Waghmode | M.A-I | SSW |
| १८ | 3422 | Ruksar Hidaytulla Momin | B.A-III | Rmomin |
| १९ | | Divya Dasharath chavan | B.A-III | Chavan |
| २० | | Anuradha Devgonda Kamble | B.A.II | ADKamble |
| २१ | | NAAZ SULTANALI FAKIR | BA II | N.S.FAKIR. |
| २२ | | Shreya Tanaji Banne. | B.A.II | S.T.Banne |
| २३ | | Pinky Uttam Shahapurkar | B.A.II | P.U.Shahapurkar |
| २४ | | Sneha Gajanan Bhopale. | B.A III | SGBhopale |
| २५ | | nikita Sunil Gejage | B.A.III | n.s.Gejage |
| २६ | | chaitrali sukumar kadam. | B.A.I | c.s.kadam. |
| २७ | | Ganesh Anil kamble | B.A.II | GAK. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २८ | | Prathamesh Balaso Biraje | B.A.I | PBB |
| २९ | | Shridhar Jakappa Ukali | B.A.I | Ukali |
| ३० | 3324 | Tushar Rajendra Kondekar | B.A.III | Kondekar |
| ३१ | 3552 | Dongare Prakash Pandurang | M.A.I | P. P. Dongare |
| ३२ | | श्री. रोहित शिंगे (मराठी विभाग) | | [illegible] |
| ३३ | | श्री. निलेश जाधव (हिंदी विभाग) | | [illegible] |
| ३४ | | | | |
| ३५ | | | | |
| ३६ | | | | |
| ३७ | | | | |
| ३८ | | | | |
| ३९ | | | | |
| ४० | | | | |
| ४१ | | | | |
| ४२ | | | | |
| ४३ | | | | |
| ४४ | | | | |
| ४५ | | | | |
| ४६ | | | | |
| ४७ | | | | |
| ४८ | | | | |
| ४९ | | | | |
| ५० | | | | |
| ५१ | | | | |
| ५२ | | | | |
| ५३ | | | | |
| ५४ | | | | |
| ५५ | | | | |
| ५६ | | | | |
| ५७ | | | | |
| ५८ | | | | |
| ५९ | | | | |
| ६० | | | | |
| ६१ | | | | |
| ६२ | | | | |
| ६३ | | | | |
| ६४ | | | | |
| ६५ | | | | |
| ६६ | | | | |
| ६७ | | | | |
| ६८ | | | | |
| ६९ | | | | |

DATTAJIRAO KADAM A.S.C. COLLEGE ICHALKARANJI

HEAD,
Department of Marathi,
D.K.A.S.C. College,
Ichalkaranji.

Principal,
D.K.A.S.C. College,
Ichalkaranji.



"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षणप्रसार "

शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे



Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha kolhapur's

Dattajirao Kadam Arts, Science and Commerce College, Ichalkaranji

Tal.- Hatkanangle Dist.- Kolhapur(M.S.) India

Affiliated to Shivaji University, Kolhapur. Accredited by NAAC "B+" Grade

# DEPARTMENT OF MARATHI

## 2025-2026

## "मराठी साहित्य लेखन" कार्यशाळा

# Certificate

मराठी पदवी व पदव्युत्तर विभाग आणि दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर यांच्याशी झालेल्या सामंजस्य (MOU) करारांतर्गत व श्रीमती आ.रा.पाटील कन्या महाविद्यालय इचलकरंजी यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दिनांक २४ जानेवारी २०२६ रोजी 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' निमित्त **"मराठी साहित्य लेखन" (Marathi Literature Writing)** या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा (Workshop) घेण्यात आली. या कार्यशाळेला श्री / कु. वैष्णवी शशिकांत कोळवे वर्ग बी.ए./बी.कॉम./एम.ए.भाग १/२/३ यांनी/हिने सक्रिय सहभाग घेतला. याबद्दल हे प्रमाणपत्र सन्मानपूर्वक देण्यात येत आहे.

प्रा.(डॉ.) सुभाष जाधव
(प्रमुख,मराठी विभाग)

DATTAJIRAO KADAM A.S.C. COLLEGE ICHALKARANJI

प्रा.(डॉ.)एस.के.खाडे
(प्राचार्य)



"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षणप्रसार "

शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे



Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha kolhapur's

# Dattajirao Kadam Arts, Science and Commerce College, Ichalkaranji

Tal.- Hatkanangle Dist.- Kolhapur(M.S.) India

Affiliated to Shivaji University, Kolhapur. Accredited by NAAC "B+" Grade

## DEPARTMENT OF MARATHI

## 2025-2026

## "मराठी साहित्य लेखन" कार्यशाळा

# Certificate

मराठी पदवी व पदव्युत्तर विभाग आणि दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर यांच्याशी झालेल्या सामंजस्य (MOU) करारांतर्गत व श्रीमती आ.रा.पाटील कन्या महाविद्यालय इचलकरंजी यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दिनांक २४ जानेवारी २०२६ रोजी 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' निमित्त **"मराठी साहित्य लेखन" (Marathi Literature Writing)** या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा (Workshop) घेण्यात आली. या कार्यशाळेला श्री / कु. सारिका संतोष वाघमारे वर्ग ~~बी.ए.~~/~~बी.कॉम.~~/एम.ए.भाग १/~~२~~/~~३~~ याने/हिने सक्रिय सहभाग घेतला. याबद्दल हे प्रमाणपत्र सन्मानपूर्वक देण्यात येत आहे.

प्रा.(डॉ.) सुभाष जाधव
(प्रमुख,मराठी विभाग)

DATTAJIRAO KADAM A.S.C. COLLEGE ICHALKARANJI

प्रा.(डॉ.)एस.के.खाडे
(प्राचार्य)



“ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षणप्रसार ”
शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे



Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha kolhapur’s

# Dattajirao Kadam Arts, Science and Commerce College, Ichalkaranji

Tal.- Hatkanangle Dist.- Kolhapur(M.S.) India
Affiliated to Shivaji University, Kolhapur. Accredited by NAAC “B+” Grade

## DEPARTMENT OF MARATHI

**2025-2026**

## “मराठी साहित्य लेखन” कार्यशाळा

# Certificate

मराठी पदवी व पदव्युत्तर विभाग आणि दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा. कोल्हापूर यांच्याशी झालेल्या सामंजस्य (MOU) करारांतर्गत व श्रीमती आ.रा.पाटील कन्या महाविद्यालय इचलकरंजी यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दिनांक २४ जानेवारी २०२६ रोजी 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' निमित्त **“मराठी साहित्य लेखन” (Marathi Literature Writing)** या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा (Workshop) घेण्यात आली. या कार्यशाळेला श्री / कु. दिव्या दशरथ चव्हाण वर्ग बी.ए./बी.कॉम./एम.ए.भाग १/२/३ याने/हिने सक्रिय सहभाग घेतला. याबद्दल हे प्रमाणपत्र सन्मानपूर्वक देण्यात येत आहे.

प्रा.(डॉ.) सुभाष जाधव
(प्रमुख,मराठी विभाग)

DATTAJIRAO KADAM A.S.C. COLLEGE ICHALKARANJI

प्रा.(डॉ.)एस.के.खाडे
(प्राचार्य)

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार " - शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha kolhapur's

Dattajirao Kadam Arts, Science and Commerce College, Ichalkaranji


**DEPARTMENT OF MARATHI**

**Activity Photo उपक्रमाचे फोटो - 2025-2026** Saturday, 24/01/2025

# 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा'




'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' निमित्त दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा कोल्हापूर यांच्या सहयोगाने सामंजस्य करारांतर्गत मराठी साहित्य लेखन कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या प्रसंगी प्रमुख वक्ते श्री अशोक जाधव यांचे स्वागत करताना प्राचार्य प्रो.(डॉ.) एस.के .खाडे, प्रो.(डॉ.) सुभाष जाधव, डॉ.अनिता आंबोकर, श्री डी.ए.यादव,श्री रोहित शिंगे




'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' निमित्त दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा कोल्हापूर यांच्या सहयोगाने सामंजस्य करारांतर्गत मराठी साहित्य लेखन कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या प्रसंगी प्रमुख वक्ते श्री अशोक जाधव मार्गदशन करताना सोबत प्रो.(डॉ.) सुभाष जाधव, डॉ.अनिता आंबोकर, श्री डी.ए.यादव, श्री रोहित शिंगे, श्रीमती प्रतिभा पैलवान

Dr. S.K. Khade
( Principal)

Principal
D.K.A.S.C.College
Ichalkaranji

DATTAJIRAO KADAM A.S.C. COLLEGE ICHALKARANJI

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार " - शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे
Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha kolhapur's
Dattajirao Kadam Arts, Science and Commerce College, Ichalkaranji
**DEPARTMENT OF MARATHI**
**Activity Photo उपक्रमाचे फोटो - 2025-2026** Saturday, 24/01/2025

# 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा'




'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' निमित्त दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा कोल्हापूर यांच्या सहयोगाने सामंजस्य करारांतर्गत मराठी साहित्य लेखन कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या प्रसंगी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्राचार्य प्रो.(डॉ.) एस.के .खाडे सोबत श्री अशोक जाधव, प्रो.(डॉ.) सुभाष जाधव, डॉ.अनिता आंबोकर, श्री .ए.यादव, श्री रोहित शिंगे




'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' निमित्त दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा कोल्हापूर यांच्या सहयोगाने सामंजस्य करारांतर्गत मराठी साहित्य लेखन कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या प्रसंगी आभार व्यक्त करताना डॉ.अनिता आंबोकर सोबत श्री अशोक जाधव, प्रो.(डॉ.) सुभाष जाधव, श्री रोहित शिंगे, श्रीमती प्रतिभा पैलवान

DATTAJIRAO KADAM A.S.C. COLLEGE ICHALKARANJI

Dr. S.K. Khade
( Principal)
Principal
D.K.A.S.C.College
Ichalkaranji

" ज्ञान,विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार " - शिक्षणमहर्षी डॉ बापूजी साळुंखे

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha kolhapur's

Dattajirao Kadam Arts, Science and Commerce College, Ichalkaranji

Tal.- Hatkanangle Dist.- Kolhapur

# DEPARTMENT OF MARATHI & IQAC

## Activity Report - 2025-2026

| | |
|---|---|
| **Name of Department** | Department of Marathi |
| **Name of Activiry** | "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा"<br>दिनांक १४ जानेवारी ते २८ जानेवारी २०२६ |
| **Resource Person** | Shri Ashok Jadhav, Principle Prof.(Dr.) S. K. Khade |
| **Date** | Saturday, 24/01/2026 |
| **Place** | College Hall |
| **No of Participated Teacher & Students** | 31 Students and 06 Teacher |
| **Brief Description** | महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग,शासन परिपत्रक क्रमांक : मभापं - २०२५ प्र.क्र. २४४ /ई – १४५८८०६ / भाषा- २ दिनांक : २४ डिसेंबर २०२५ च्या पत्रानुसार दिनांक १४ जानेवारी ते २८ जानेवारी या कालावधीत "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" साजरा करण्यात येणार आहे. या निमित्ताने मराठी विभाग आणि दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर यांच्याशी झालेल्या सामंजस्य (MOU) करारांतर्गत आणि श्रीमती आ.रा.पाटील कन्या महाविद्यालय, इचलकरंजी यांच्या सहयोगाने शनिवार दिनांक २४/०१/२०२६ रोजी सकाळी ९.३० वाजता "मराठी साहित्य लेखन कार्यशाळा" या विषयावर कार्यशाळा संपन्न झाली. या प्रसंगी प्रसिद्ध लेखक श्री अशोक जाधव (भंगार आत्मकथनाचे लेखक) यांनी मार्गदर्शन केले.<br>या विषयावर बोलताना लेखन ही कला नाही तर ती तपश्चर्य आहे. लेखक घडवता येत नाही तो स्वतः घडावा लागतो. लेखक होण्यासाठी अनेक वर्षांचा कालावधी जावा लागतो. साहित्य म्हणजे मानवी अनुभवाची सर्जनशील मांडणी असते. लेखकाच्या मनात विचार येण्यासाठी समाजात गेले पाहिजे. अनुभव माणसाला लिहिण्यास प्रवृत्त करतो. यातून नैसर्गिकरित्या लेखन होते. समाजातील प्रश्नांची जाणीव मनात निर्माण होते ती खरी सर्जनशीलता आहे. लेखनासाठी पहिल्यांदा कच्चा आराखडा तयार असला पाहिजे.<br>मराठी साहित्याची परंपरा खूप मोठी सांगितली. साहित्य समाजाचा आरसा असतो. साहित्य लेखन हे मानवाच्या कल्याणात्मकतेसाठी लिहिले जाते. प्रत्येक लेखनाची सुरुवात एका ठिणगीतून होते. दुःख, आठवण, अनुभव इत्यादी गोष्टींचा उपयोग लेखनासाठी केला जातो. वाचकांच्या मनामध्ये स्थान निर्माण करणारे लेखन केले जीते. अनुभवाशिवाय लेखन करता येत नाही . लेखनासाठी निरीक्षण, विषय निवड, अनुभव, मांडणी, भाषाशैली अशा टप्प्यातून लेखन वाचनीय झाले पाहिजे.<br>कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. (डॉ.) एस.के. खाडे उपस्थित होतो. अध्यक्षीय मनोगतामध्ये साहित्य वाचनाने माणूस समृद्ध होतो. वाचन ही काळाची गरज आहे. नियमितपणे माणसांनी रोज काही काळ वाचन केले पाहिजे. पुस्तकातून मिळणारी ज्ञानाची शिदोरी आयुष्य जगण्याला प्रेरणा देत असते. कार्यक्रमाचे वास्तविक व पाहण्याचा परिचय प्रो. (डॉ . ) सुभाष जाधव यांनी करून दिले आहे . कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्री रोहित शिंगे यांनी केले . |
| **Outcomes** | १. लेखक कसा घडतो याविषयी माहिती समजून आली.<br>२. लेखकाकडे कोणते गुण असावेत याविषयी माहिती मिळाली. |

| | |
|---|---|
| | ३. लेखकाचा अनुभव कसा असावा या विषयी माहिती मिळाली.<br>४. मराठी साहित्य लेखनातील विविध टप्पे लक्षात आले.<br>५. मराठी वाङ्मयात लिहिले गेलेले कथा, कादंबरी, नाटक, चरित्र- आत्मचरित्र इतर प्रकारांची माहिती समजली. |
| **Convener Name and Signature** | Prof. (Dr.) Subhash Jadhav |

**HEAD,**
Department of Marathi,
D.K.A.S.C. College,
Ichalkaranji.

DATTAJIRAO KADAM A.S.C. COLLEGE ICHALKARANJI

Prof.(Dr.) S.K. Khade
Principal,
D.K.A.S.C. College
Ichalkaranji.

**"Dissemination of Education for Knowledge, Science and Culture."**
**– Shikshanmaharshi Dr Bapuji Salunkhe**

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha kolhapur's

Dattajirao Kadam Arts, Science and Commerce College, Ichalkaranji

Tal.- Hatkanangle Dist.- Kolhapur

# DEPARTMENT OF MARATHI & IQAC

## Activity Report - 2025-2026

| | |
|---|---|
| **Name of Department** | Department of Marathi |
| **Name of Activiry** | "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा"<br>दिनांक १४ जानेवारी ते २८ जानेवारी २०२६ |
| **Resource Person** | Shri Ashok Jadhav, Principle Prof.(Dr.) S. K. Khade |
| **Date** | Saturday, 24/01/2026 |
| **Place** | College Hall |
| **No of Participated Teacher & Students** | 31 Students and 06 Teacher |
| **Brief Description** | Government of Maharashtra, Marathi Language Department, Government Circular No.: MBHAP - 2025 Pr.No. 244 /E – 1458806 / Language- 2 Date: As per the letter dated 24th December 2025, "Marathi Language Promotion Fortnight" will be celebrated from 14th January to 28th January. On this occasion, a workshop on the topic "Marathi Literary Writing Workshop" was held on Saturday, 24/01/2026 at 9.30 am under a Memorandum of Understanding (MOU) signed with the Marathi Department and Dakshin Maharashtra Sahitya Sabha, Kolhapur. Under the agreement and in collaboration with Smt. A.R. Patil Girls' College, Ichalkaranji On this occasion, famous author Mr. Ashok Jadhav (author of Bhangar Autobiography) guided.<br>Speaking on this topic, writing is not an art, it is an asceticism. A writer cannot be made, he has to make himself. It takes many years to become a writer. Literature is the creative expression of human experience. To get ideas in the mind of a writer, one must go to society. Experience motivates a person to write. This naturally leads to writing. Real creativity is when awareness of the problems in society arises in the mind. A rough outline should be prepared first for writing.<br>The tradition of Marathi literature is very long. Literature is a mirror of society. Literary writing is written for the welfare of humanity. Every piece of writing begins with a spark. Things like sorrow, memories, experiences, etc. are used for writing. Writing that creates a place in the minds of the readers wins. Writing cannot be done without experience. For writing, the writing should be readable through stages such as observation, topic selection, experience, layout, and language style.<br>The program was presided over by the Principal of the college, Prof. (Dr.) S.K. Khade. In the presidential address, a person becomes enriched by reading literature. Reading is the need of the hour. People should read regularly for some time every day. The wealth of knowledge gained from books inspires us to live life. The program was introduced both visually and physically by Prof. (Dr.) Subhash Jadhav. The program was moderated by Shri Rohit Shinge. |
| **Outcomes** | 1. I understood information about how a writer is made.<br>2. I got information about what qualities a writer should have.<br>3. I got information about what kind of experience a writer should have.<br>4. Various stages in Marathi literary writing were noted. |

| | |
|---|---|
| | 5. Information on stories, novels, plays, biographies and autobiographies and other forms written in Marathi literature was understood. |
| **Convener Name and Signature** | Prof. (Dr.) Subhash Jadhav |

HEAD,
Department of Marathi,
D.K.A.S.C. College,
Ichalkaranji.

Prof.(Dr.) S.K. Khade
Principal,
D.K.A.S.C. College,
Ichalkaranji.

इचलकरंजी-शिरोळ-हातकणंगले परिसर

सकाळ TODAY

कोल्हापूर, गुरुवार, २९ जानेवारी २०२६ २



इचलकरंजी : डीकेएएससी कॉलेजमध्ये मराठी साहित्य लेखन कार्यशाळेत लेखक अशोक जाधव यांनी मार्गदर्शन केले.

# लेखन कला नव्हे तपश्चर्या

## अशोक जाधव : डीकेएएससी कॉलेजमध्ये कार्यशाळा

**सकाळ वृत्तसेवा**

इचलकरंजी, ता. २८ : लेखन ही कला नाही, तर ती तपश्चर्या आहे, असे मत भंगार पुस्तकाचे लेखक अशोक जाधव यांनी व्यक्त केले. डीकेएएससी कॉलेजमध्ये मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त आयोजित मराठी साहित्य लेखन कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. के. खाडे होते.

पुढे मार्गदर्शन ते म्हणाले, 'लेखक घडवता येत नाही तो स्वतः घडावा लागतो. लेखक होण्यासाठी अनेक वर्षांचा कालावधी जावा लागतो. साहित्य म्हणजे मानवी अनुभवाची सर्जनशील मांडणी असते. लेखकाच्या मनात विचार येण्यासाठी समाजात गेले पाहिजे. अनुभव माणसाला लिहिण्यास प्रवृत्त करतो. यातून नैसर्गिकरीत्या लेखन होते. समाजातील प्रश्नांची जाणीव मनात निर्माण होते ती खरी सर्जनशीलता आहे. प्रत्येक लेखनाची सुरुवात एका ठिणगीतून होते. दुःख, आठवण, अनुभव आदी गोष्टींचा उपयोग लेखनासाठी केला पाहिजे.' कार्यशाळेसाठी दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा कोल्हापूर, श्रीमती आ. रा. पाटील कन्या महाविद्यालयाचे सहकार्य लाभले. प्रास्ताविक डॉ. सुभाष जाधव यांनी केले. सूत्रसंचलन प्रा. रोहित शिंगे यांनी केले. आभार डॉ. अनिता आंबेकर यांनी मानले. डी. ए. यादव, नीलेश जाधव आदी उपस्थित होते.

मराठी भाषा संवर्धन पंधरवडानिमित्त
मराठी साहित्य लेखन कार्यशाळा
मार्गदर्शक - श्री अशोक जाधव
(भंगार आत्मकथनाचे लेखक)

DATTAJIRAO KADAM A.S.C. COLLEGE ICHALKARANJI

29/01/26
प्राचार्य,
डी.के.ए.एस.सी. कॉलेज,
इचलकरंजी.

भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये　Rs. 100

रु. 100　ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA　0 2024 8 कोणत्याही प्रतिज्ञापत्रा व्यतिरिक्त　12AB 819360

| | | |
|---|---|---|
| दस्ताचा प्रकार : | | अनुच्छेद क्रमांक |
| दस्त नोंदणी करणार आहात का? | : | दु.नि.कार्यालयाचे नांव : |
| मिळकतीचे वर्णन | : | |
| मोबदला रक्कम | : | |
| मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नांव व पत्ता | : | दत्ताजीराव कदम आर्टस,सायन्स अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज इचलकरंजी प्राचार्य डॉ. एस.एम. मणेर |
| हस्ते असल्यास त्याचे नांव व पत्ता | : | रोहित प्रकाश शिंगे रा. इचलकरंजी |
| दुसऱ्या पक्षकाराचे नांव व पत्ता | : | द.म.सा. सभा कोल्हापूर |
| मुद्रांक शुल्क एकूण रूपये | : | 100 पैकी रू. |
| मुदांक विक्री नोंद वही अनुक्रमांक | : | 4058 दिनांक : 23/07/2024 |

मुद्रांक विकत घेणाऱ्याची सही　　　　मुद्रांक विक्रेत्याची सही

मुद्रांक विक्रेत्याचे नांव : श्री श्रीकांत तुकाराम सातपुते, पत्ता - अग्नीशमनदल (फायर ब्रिगेड) रोड, लगारे बिल्डींग, इचलकरंजी
मुद्रांक विक्री परवाना क्रमांक : ८/९३ लायसन्स कोड नं. २६०७००९

ज्या कारणासाठी ज्यांनी मुदांक खरेदी केला त्यांनी त्याच कारणासाठी मुद्रांक खरेदी केल्यापासून ६ महिन्यात वापरणे बंधनकारक आहे.

Sub Treasury Office Ichalkaranji
16 JUL 2024
Sub Treasury Officer Ichalkaranji

दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी

तालुका हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर ४१६११५

मराठी विभाग

आणि

दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर. या [illegible]

DATTAJIRAO KADAM A.S.C. COLLEGE ICHALKARANJI

Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

# सामंजस्य करार

# MEMORANDUM OF UNERSTANDING BETWEEN

## दिनांक २४ जुलै २०२४

### ❖ समन्वय आणि अंमलबजावणी

१. सदर कराराची जबाबदारी, समन्वयक आणि अंमलबजावणीसाठी दक्षिण महाराष्ट्र मराठी साहित्य सभेचे अध्यक्ष, सचिव कार्यरत राहतील. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य, मराठी विभाग प्रमुख आणि समन्वयक काम करतील.

२. सदर सामंजस्य करार महाविद्यालयाच्या लेटर हेडवर, कायदेशीर भाषेमध्ये तसेच कायदेशीर अटीशी अधिन राहून तीन प्रतीमध्ये अंमलात येत आहे.

३. सदरहू परस्पर सामंजस्य करार हा पुढील समन्वयक अधिका-यांना होत आहे. तसेच वर नमूद केलेल्या दिनांकापासून अंमलात येत आहे.

**प्रस्तावना**

मराठी शिक्षकांच्या दर्जेदार अध्यापनासाठी ज्ञानप्रसार आणि संशोधन या संदर्भात विविध उपक्रम राबविले जातात. त्यानुसार विविध विषयावर राष्ट्रीय चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळेचे आयोजन केले जाते. विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेचे आणि साहित्याचे विकसन करण्याच्या दृष्टीने निबंधलेखन, कथालेखन, काव्यलेखन, काव्यवाचन, अशा विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते. तसेच मराठी प्राध्यापकांच्या शोधनिबंधांना पारितोषिक, ललित, ललितेतर, संपादित ग्रंथांना पारितोषिक दिले जाते. महाविद्यालयाच्या मराठी विभागामार्फत विविध उपक्रम आयोजित केले जातात. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना योग्य दिशा देण्याचे काम केले जाते. या सामंजस्य करारातून दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर या संस्थेच्या माध्यमातून विविध उपक्रमांचे आयोजन करता येईल. विद्यार्थी केंद्रित उपक्रमासाठी महाविद्यालयाचा मराठी विभाग व दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा यांच्यात हा सामंजस्य करार करण्यात येत आहे.

वरील नमूद केलेल्या दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर आणि मराठी विभाग दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी या संस्था दिनांक २४ जुलै, २०२४ रोजी एकमेकांबरोबर सामंजस्य करार करत आहेत. सदर कराराची अंमलबजावणी पुढील पाच वर्षासाठी करण्यात येईल. या कराराची उद्दिष्टये पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आली आहेत.

Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

**उद्दिष्ट्ये :**

१. मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती यांचे संवर्धन करणे आणि विविध विषयांवर संशोधन प्रकल्प राबविणे.
२. चर्चासत्र, कार्यशाळा, परिसंवाद, काव्यसंमेलन, संयुक्त बैठका यांचे आयोजन करणे.
३. महाविद्यालयीन स्तरावरील विद्यार्थी केंद्रित विविध उपक्रमांसाठी सहयोग व सहकार्य करणे.
४. निबंध, वक्तृत्व, वाद-विवाद प्रश्नमंजूषा कथालेखन काव्यलेखन, काव्यवाचन, कथा-कथन इ. स्पर्धांचे आयोजन करणे.
५. व्यक्तिमत्त्व विकास व कौशल्य विकास प्रकल्प राबविणे.
६. सर्जनशील लेखन व उपयोजित मराठी लेखन प्रकल्प राबविणे.
७. विद्यार्थ्यांचा भाषिक विकास करण्यासाठी सहकार्य करणे.
८. मराठी भाषेतील दर्जेदार साहित्यकृती विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देणे.
९. विद्यार्थ्यांना साहित्य निर्मितीसाठी प्रोत्साहन देणे. त्यासाठी कार्यशाळांचे आयोजन करणे.
१०. मराठी भाषा संवर्धनासाठी व भाषा विकासासाठी प्रयत्न करणे.

**अटी आणि शर्थी**

१. महाविद्यालयातील मराठी विभागाच्या विविध उपक्रमामध्ये दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, ही संस्था सक्रिय सहभाग घेईल. तसेच दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभेच्या विविध उपक्रमामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापक सहभागी होतील.
२. दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर या संस्थेचा एखादा उपक्रम महाविद्यालयाच्या मराठी विभागाने राबवायचा असल्यास संकल्पित आर्थिक तरतूद संस्था करेल. अन्यथा आपापल्या खर्चाने एकमेकांना सहकार्य करणे अपेक्षित आहे.
३. उपरोक्त नमूद दोन्ही संस्थां परस्पर सहमतीच्या उपक्रमाखेरीज संस्थांच्या उद्दिष्टपूर्तीसाठी आवश्यक उपक्रम आपल्या सोयीनुसार घेण्यास स्वतंत्र असतील. त्यासाठी परस्परांच्या संमतीची आवश्यकता असणार नाही.
४. परस्पर सामंजस्य करारातील, उदाहरणातील नुतनीकरण करणे आणि परस्परांच्या लेखी करारांची कोणत्याही क्षणी समाप्ती होऊ जाऊ शकते. साठ दिवसांच्या पूर्व लेखी सूचनेनुसार दोन्ही पैकी कोणत्याही संस्थेला करार संपुष्टात आणता येईल.
५. कोणत्याही प्रकारचा भत्ता एकमेकांना देणे बंधनकारक नाही.
६. सदर परस्पर सामंजस्य कराराचा कालावधी पाच वर्षांनंतर संपुष्टात येईल. परस्पर सहमतीने आणखी पाच वर्षांसाठी हा करार पुढे चालू ठेवता येईल.
७. यासाठी निश्चित दिनांक व लेखी अनुमती यांची आवश्यकता बंधनकारक असेल.

Scanned with OKEN Scanner

## एकमेकांना सहाय्य करण्याची प्रस्तावित माध्यमे

१. परस्पर हिताच्या शैक्षणिक बाबींमध्ये सहकार्य करणे.
२. विविध उपक्रमांचे आयोजन करण्यासाठी परस्परांशी सहकार्य करणे.
३. उपलब्ध साधनसामग्रीनुसार या संस्थाकडून एक निश्चित योजना तयार करणे.
४. मराठी भाषा संवर्धनासाठी विविध उपक्रम राबविणे.
५. विद्यार्थी केंद्रित उपक्रम आयोजित करणे. त्यासाठी एकमेकांना सहकार्य करणे.
६. शैक्षणिक व मराठी भाषा संवर्धनासाठी विविध उपक्रम राबविणे व त्यासाठी एकमेकांना सहकार्य करणे.

## समारोप

प्रस्तुत करार हा केवळ शैक्षणिक मराठी भाषा संवर्धनासाठी विविध उपक्रम घेण्यासाठी करण्यात आलेला आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध उपक्रमामध्ये सहभागी करून घेता येईल. तसेच दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर आणि मराठी विभाग, दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी या संस्थांच्या माध्यमातून महाविद्यालयामध्ये विविध उपक्रम घेता येतील. विद्यार्थ्यांना मराठी विषयाची विविध माहिती करून देणे, त्यांना साहित्याची आवड होईल या दृष्टीने प्रयत्न करणे. यासाठी एकमेकांना आवश्यक ते सहकार्य करणे हा या कराराचा मुख्य हेतू आहे.

याप्रमाणे आम्ही खालीलप्रमाणे सामंजस्य करारासाठी सह्या करीत आहोत.

प्रा. (डॉ.)सुभाष जाधव
(प्रमुख, मराठी विभाग)
प्रमुख
मराठी विभाग
डी.के.ए.एस.सी.कॉलेज
इचलकरंजी

डॉ. एस. एम. मणेर
प्राचार्य,
डी.के.ए.एस.सी. कॉलेज,
इचलकरंजी.

डॉ. विनोद कांबळे
(कार्यवाह)
दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा,
कोल्हापूर

श्री. भीमराव धुळुबुळू
(अध्यक्ष)
दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा,
कोल्हापूर

PRINCIPAL
Dattajirao Kadam A. S. C. College
Ichalkaranji

Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner